मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे “मॉक ड्रिल”

## सांडपाणी शुद्धीकरण केंद्रात गॅस लिकेज आणि बचावकार्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चऱ्होली उपअग्निशमन केंद्रामार्फत सांडपाणी शुद्धीकरण केंद्र (सिव्हेज ट्रीटमेंट प्लांट) येथे गॅस लिकेज, स्वतःचा आणि इतरांचा बचाव, आग आणि आगीचे प्रकार तसेच आग विझविण्याच्या पद्धतींवर आधारित मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित कर्मचारी व नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत काय करावे आणि काय करू नये, याबाबत मार्गदर्शन केले.



महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे यांच्या अधिपत्याखाली उपअग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे आणि प्रभारी उपअग्निशमन अधिकारी विकास नाईक यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मॉक ड्रिलमध्ये अग्निशमन विभागाचे जवान, सांडपाणी शुद्धीकरण केंद्राचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक सहभागी झाले होते.

गॅस लिकेज झाल्यास काय उपाययोजना कराव्यात, परिसर तात्काळ रिकामा करण्याचे महत्त्व, अग्निशमन साधनांचा वापर करून आग लागल्यास तात्काळ नियंत्रणात आणण्यासाठी काय करावे, तसेच स्वतःचा आणि इतरांचा जीवितहानीपासून बचाव कसा करावा, याबाबत सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचे प्राणरक्षण आणि सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. अशा मॉक ड्रिलमुळे पिंपरी चिंचवड महापालिकेचा अग्निशमन विभाग अशा उपक्रमांद्वारे नागरिक आणि कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षा संस्कार रुजवण्याचे कार्य करत आहे.
>
> – प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

अग्निशमन दलातील जवानांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे गॅस लिकेज ओळखण्याची चिन्हे, लहान व मोठ्या आगीचे प्रकार आणि विविध अग्निशामक उपकरणांचा योग्य वापर कसा करावा, हे दाखवून दिले.

तसेच सांडपाणी शुद्धीकरण केंद्रामध्ये कोणीही व्यक्ती किंवा प्राणी पडल्यास, त्या ठिकाणी असलेल्या विषारी वायूंपासून स्वतःचे आणि केंद्रामध्ये अडकलेल्या व्यक्ती अथवा प्राण्याचे रक्षण करून प्राथमिक स्तरावर बचावकार्य कसे करावे, याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणात अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांडपाणी शुद्धीकरण केंद्रामधील बचावकार्य करताना पीपीई साधनांचा वापर, विषारी वायू ओळखण्यासाठी गॅस डिटेक्टर, हवेची गुणवत्ता तपासणी, सुरक्षित प्रवेश व निर्गमन तसेच आपत्कालीन तयारी याबाबत सविस्तर माहिती दिली.

---

# शेखर सिंह यांच्या बदलीपूर्व कामांवर राष्ट्रवादी शरद पवार गटाचा ‘RTI’

## शहराध्यक्ष तुषार कामठे यांचा सवाल : सर्व निर्णय, निविदा मंजुरींची चौकशी करा

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माजी आयुक्त शेखर सिंह (IAS) यांच्या बदलीपूर्व ३० दिवसांत मंजूर केलेल्या भांडवली कामांवर आणि टेंडर प्रक्रियेवर सध्या राजकीय वाद उभा आहे. भाजपने शहरात दोन ठिकाणी आयुक्तांचा नागरी सन्मान सोहळा आयोजित केला असून, त्याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित करत माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत लेखा विभागाला सविस्तर माहिती मागितली आहे.





याबाबत तुषार कामठे यांनी लेखा विभागाला दिलेल्या अर्जात, ११ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांनी मंजूर केलेल्या सर्व भांडवली कामांची यादी, विभागाचे नाव, कामाचे नाव, अंदाजपत्रक रक्कम, मंजुरी दिनांक तसेच मंजूर झालेल्या टेंडरचे कामाचे नाव, अंदाजपत्रक रक्कम, मंजूर कंत्राटदाराचे नाव, निविदा क्रमांक, मंजुरी दिनांक यांसह तपशील मागितला आहे. विशेष आदेशाने किंवा तातडीने मंजूर करण्यात आलेल्या कामांचा स्वतंत्र तपशील आणि टेंडर संबंधित फाइलचा तपशील देखील अर्जात नमूद आहे.

> भाजपने आयुक्तांना मोठा नागरी सन्मान दिला आहे, पण त्यांच्या कारकीर्दीतील काही गंभीर प्रश्नांवर कोणतीही प्रकाशझोत टाकली जात नाही, हे आश्चर्यकारक आहे. शेखर सिंह यांच्या बदलीपूर्व काळात मंजूर झालेल्या कामांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याचे संशय आहे. आमचा उद्देश महापालिकेतील प्रत्येक निर्णयाची पारदर्शकता वाढवणे आणि जनतेच्या पैशाचा योग्य वापर सुनिश्चित करणे हा आहे. म्हणूनच आम्ही माहितीचा अधिकाराचा उपयोग करून संपूर्ण तपशील मागत आहोत, ज्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होऊ शकेल.
>
> - तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी शरद पवार गट.

शेखर सिंह यांना नाशिक येथील कुंभमेळा आयुक्तपदी नुकतीच नियुक्ती मिळाली आहे. ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील अधिकारी म्हणून ओळखले जातात. यामुळे त्यांच्या महानगरपालिकेतील कारकीर्दीवर सध्या प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेखर सिंह यांची कारकीर्द स्थानिक राजकीय वर्तुळातही ही घटना मोठ्या चर्चेचा विषय ठरली असून, त्यांच्या काळातील कामकाजात अनियमितता किंवा गैरव्यवहार झाल्याचे आरोप सातत्याने केले जात आहेत.

# राज्यातील जिल्हा परिषद पदवीधर शिक्षकांची “दिवाळी गोड”

## पदवीधर वेतन त्रुटी निवारण लागू करण्याचा निर्णय; आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश



**पिंपरी | प्रतिनिधी**

सध्या देशभरात आठव्या वेतन आयोगाबाबत चर्चा सुरू असतानाच महाराष्ट्र शासनाने एक पाऊल पुढे टाकत सातव्या वेतन आयोगाच्या अंतर्गत येणाऱ्या त्रुटी दूर करण्याचा निर्णय घेतला आहे. याच अंतर्गत राज्य शासनाने पदवीधर वेतन त्रुटी निवारण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सातव्या वेतन आयोगाच्या सुधारणांनंतर काही पदवीधर शिक्षकांचे वेतन पूर्वीपेक्षा कमी झाल्याचे निदर्शनास आल्याने, शासनाने ही त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पात्र पदवीधर शिक्षकांना योग्य वेतनश्रेणी लागू होईल आणि त्यांना होणारा आर्थिक अन्याय दूर होणार आहे. यामुळे पदवीधर शिक्षकांची गेल्या वर्षानुवर्षांची मागणी पूर्ण होतानाच त्यांची “दिवाळी गोड” होत आहे, अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर, काही पदवीधर शिक्षकांना कमी वेतनवाढ मिळाली होती. यामुळे त्यांच्या वेतनात अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली होती. ही त्रुटी निवारण व्हावी याकडे विधानसभा अधिवेशनामध्ये आमदार महेश लांडगे यांनी शासनाचे लक्ष वेधले होते. तसेच, महाराष्ट्र राज्य पदवीधर ,प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या माध्यमातून या संदर्भात पत्र व्यवहार देखील केला होता. शासनाने ही वेतन निश्चितीमधील त्रुटी दूर करण्यासाठी निर्णय घेतला आहे, जेणेकरून पात्र शिक्षकांना न्याय मिळेल.या निर्णयामुळे पदवीधर शिक्षकांचे वेतन सुधारित वेतनश्रेणीनुसार निश्चित केले जाईल आणि त्यांना जुन्या वेतनापेक्षा कमी वेतन मिळणार नाही.

राज्य शासनाने वेतनत्रुटी समितीच्या अनुशंगाने वित्त विभागाचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. पण, ग्रामविकास विभागाचा शासन निर्णयाची प्रतिक्षा होती. त्यामुळे जिल्हा परिषद शिक्षकांच्या वेतनत्रुटीत सुधारणा रखडली होती. आता वेतनत्रुटी निवारण समिती 2024 च्या अहवालातील वेतनश्रेणी विषयक व अनुषंगिक शिफारशी लक्षात घेऊन ग्रामविकास विभागाने या संदर्भात आदेश पारित केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कक्ष अधिकारी दिपाली पवार यांच्या आदेशाने वेतन त्रुटी निवारण लागू करण्याचा निर्णय देण्यात आला आहे. याबाबत राज्यस्तरावर ग्रामविकास विभागाच्या पदवीधर वेतन त्रुटीचा शासन निर्णय निर्गमित झाल्याने जिल्हा परिषद पदवीधर शिक्षकांच्या वेतन त्रुटी बाबतच्या अडचणी दूर होऊन वेतन निश्चिती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद पदवीधर शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य पदवीधर ,प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेचे राज्य सरचिटणीस मनोज मराठे यांनी व्यक्त केली आहे.

### ..असा आहे निर्णय

» जिल्हा परिषद पदवीधर शिक्षकांच्या संदर्भात सहायक शिक्षक यांचे वेतन दिनांक 1 जानेवारी 2016 नुसार एस-13 मध्ये आणि सहायक शिक्षकपदावरून पदवीधर शिक्षक म्हणून नियुक्ती झालेल्या पदवीधर शिक्षकांचे वेतन एस-14 या वेतनश्रेणीत निश्चित करतांना सहायक शिक्षकांपेक्षा पदवीधर शिक्षकांचे 2016 रोजीचे मूळ वेतन कमी होत असल्यास तसेच ज्या सहायक शिक्षक यांची 2016 नंतर पदवीधर शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्यास, दिनांक 2016 पूर्वी पदवीधर शिक्षक म्हणून नियुक्ती झालेल्या पदवीधर शिक्षकांपेक्षा एस-१४ या वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करताना जास्त वेतन निश्चित होत असल्याचे निदर्शनास येत असल्यास, अशा दोन्ही प्रकरणी वित्त विभागाच्या जून 2025 रोजीच्या शासन निर्णया नुसार समितीने केलेली शिफारस लागू राहील.

> “ सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर, काही पदवीधर शिक्षकांना कमी वेतनवाढ मिळाली होती. यामुळे त्यांच्या वेतनात अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली होती. शासनाने ही वेतन निश्चितीमधील त्रुटी दूर करण्यासाठी निर्णय घेतला आहे. यामुळे पदवीधर शिक्षकांना नक्कीच न्याय मिळाला आहे. दिवाळीच्या तोंडावर आलेला हा निर्णय दिवाळी गोड करणारा ठरला आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार व्यक्त करतो.
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# मावळात राष्ट्रवादी काँग्रेसचा शक्तीप्रदर्शन मेळावा संपन्न

## आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा जोश, पक्षाच्या बळकटीकरणाला नवा वेग



**पिंपरी | प्रतिनीधी**

मावळ विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ते व पदाधिकारी यांचा भव्य मेळावा पार पडला. या मेळाव्याच्या माध्यमातून पक्ष संघटन बळकट करणे, आगामी निवडणूक धोरण आखणे आणि जनतेपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका पोहोचवणे या दृष्टीने महत्त्वपूर्ण चर्चेला वाव मिळाला.

या मेळाव्यात कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. उपस्थित कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी एकसंघतेचा निर्धार व्यक्त करत पक्षाच्या झेंड्याखाली नव्या जोमाने काम करण्याची तयारी दर्शवली. मावळ तालुक्यातील विविध भागांमधून शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून सभेला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले.

कार्यक्रमात वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकांसाठी दिशा दाखवली. त्यांनी पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना संघटनशक्ती वाढवण्याचे आवाहन केले. मावळच्या सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकदिलाने लढेल, असा ठाम निर्धार या मेळाव्यातून व्यक्त झाला.

या मेळाव्याची शोभा वाढवणारी प्रमुख उपस्थिती होती मावळचे लोकप्रिय आमदार सुनील शेळके यांची. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि आत्मविश्वास दिसून आला. मावळच्या जनतेसाठी सातत्याने विकासकामे, जनसंपर्क आणि जनसेवा करणारे सुनील शेळके हे पक्षाच्या संघटनाचे केंद्रबिंदू ठरत असल्याचे या मेळाव्यात स्पष्टपणे जाणवले.

तसेच, २० ऑक्टोबर रोजी अजितदादा पवार यांच्या हस्ते होणाऱ्या तळेगाव दाभाडे नगरपरिषद नूतन इमारत उद्घाटन कार्यक्रमाच्या नियोजनाची सविस्तर चर्चा या बैठकीत करण्यात आली. हा कार्यक्रम मावळ तालुक्यातील राजकीय आणि विकासात्मक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आगामी निवडणुकांसाठी सज्ज असल्याचे या मेळाव्यातून अधोरेखित झाले.

या बैठकीला मावळ तालुक्यातील सर्व सेलचे पदाधिकारी, सुकाणू समितीचे सदस्य, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पक्षाच्या प्रत्येक आघाडीच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीमुळे मेळाव्याला भव्यता प्राप्त झाली आणि एकजुटीचा संदेश संपूर्ण तालुक्यात पसरला.

एकूणच, या मेळाव्याने मावळ तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवा आयाम मिळवून दिला असून, आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बळकटीकरणाला नवचैतन्य प्राप्त झाले आहे.

# जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचे बिगुल

## जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी 73 गटांची आरक्षण सोडत सोमवारी जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी ७३ गटांची आरक्षण सोडत सोमवारी जाहीर करण्यात आली. या सोडतीनुसार अनुसूचित जातींसाठी सात, अनुसूचित जमातींसाठी पाच आणि नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्गासाठी १९ असे गट राखीव झाले आहेत. त्यापैकी दहा जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.दरम्यान, आरक्षणाचा फटका काही मोठ्या नेत्यांना बसणार असून त्यांना अन्य पर्याय शोधावा लागणार असल्याचे सोडतीनंतर स्पष्ट झाले.

जिल्हा परिषदेच्या गटांसाठीची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते-देशमुख, कुळ कायदा शाखेचे तहसीलदार जगदीश निंबाळकर, निवडणूक शाखेचे तहसीलदार राहुल सारंग यावेळी उपस्थित होते. हवेली तालुक्यातील गाऊडदरा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

आरक्षणानुसार सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४२ गट राखीव झाले असून त्यापैकी २० गट महिलांसाठी राखीव आहेत. एकूण ७३ गटांपैकी ३७ गट महिलांसाठी राखीव झाले असून त्यामध्ये अनुसूचित जाती सात गट असून त्यापैकी चार गट महिलांसाठी, अनुसूचित जमातींसाठी पाच गट असून त्यापैकी तीन गट महिलांसाठी तर नागरिकांचा मागासर्वग प्रवर्गासाठी १९ गट राखीव झाले असून त्यापैकी दहा गट महिलांसाठी आरक्षित झाले आहेत.



**अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी राखीव गट**

इंदापूर – ७१ लासुर्णे
इंदापूर – ७० वालचंदनगर
बारामती – ६१ गुणवडी
हवेली – ४१ लोणीकाळभोर

**अनुसूचित जाती (पुरुष) प्रवर्गासाठी राखीव गट**

बारामती- ६५ निरावागज
दौंड -४५ गोपाळवाडी
हवेली- ३९ उरुळीकांचन

**अनुसूचित जमाती (महिला) प्रवर्गासाठी राखीव गट**

जुन्नर – ८ बारव
जुन्नर – १ डिंगोरे
आंबेगाव – ९ शिनोली

**अनुसूचित जमाती (पुरुष) प्रवर्गासाठी राखीव गट**

खेड- २१ वाडा
मावळ- २९ टाकवे बुद्रूक

**नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) साठी राखीव गट**

खेड – २२ कडूस
बारामती – ६० सुपा
हवेली – ४० थेऊर
शिरूर – १५ न्हावरा
जुन्नर – ४ राजुरी
जुन्नर – ६ नारायणगांव
जुन्नर – २ ओतूर
पुरंदर – ५३ नीरा शिवतक्रार
जुन्नर – ५ बोरी बुद्रूक
इंदापूर – ६७ पळसदेव

**नागरिकांचा मागास (पुरुष) प्रवर्गासाठी राखीव गट**

हवेली – ३७ पेरणे
वेल्हे – ५५ वेल्हे बुद्रूक
खेड – २५ मेदनकरवाडी
मुळशी – ३६ पिरंगुट
शिरूर – २० मांडवगण फराटा
दौंड – ४९ यवत
आंबेगाव – १३ अवसरी बुद्रूक
भोर – ५६ वेळू
मुळशी- ३४ पौड

**सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव गट**

खेड – २३ रेटवडी
दौंड – ४७ पाटस
बारामती – ६३ वडगाव निंबाळकर
शिरूर – १९ तळेगाव ढमढेरे
इंदापूर – ६९ निमगाव केतकी
मावळ – ३१ खडकाळे
आंबेगाव – ११ कळंब
दौंड – ४४ वरवंड
शिरूर – १८ शिक्रापूर
आंबेगाव – १० घोडेगाव
मावळ – ३० इंदुरी
हवेली – ४२ खेड शिवापूर
खेड – २६ पाईट
इंदापूर – ६६ भिगवण
शिरूर – १६ रांजणगाव गणपती
खेड – २८ कुरुळी
मावळ – ३३ सोमाटणे
इंदापूर – ७३ बावडा
पुरंदर – ५० गराडे
हवेली – ३८ कोरेगाव मुळ

**सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव जागा**

शिरूर-१७ पाबळ
जुन्नर- ३ आळे
भोर- ५९ उत्रौली
दौंड- ४६ खडकी
बारामती-६२ पणदरे
आंबेगाव- १२ पारगाव तर्फे अवसरी बुद्रूक
पुरंदर ५२ वीर
दौड – ४८ बोरीपार्धी
मुळशी- ३५ हिंजवडी
पुरंदर- ५१ बेलसर
खेड- २४ पिंपळगाव तर्फे खेड
जुन्नर- ७ सावरगाव
दौंड ४३ राहू
भोर- ५७ भोंगवली
शिरूर- १४ कवठे येमाई
मावळ -३२ कुसगाव बुद्रूक
वेल्हे- ५४ विंझर
इंदापूर- ७२ काटी
बारामती-६४ निंबूत
खेड- २७ नाणेकरवाडी
इंदापूर- ६८ वडापुरी
भोर- ५८ भोलावडे

### भिगवणऐवजी लोणीकाळभोर

» नवीन आरक्षण पद्धतीनुसार अनुसूचित जाती आणि जमाती यांचे आरक्षण हे जिल्ह्यातील गटांमध्ये सर्वाधिक लोकसंख्येच्या गटापासून उतरत्या क्रमाने काढणे अपेक्षित आहे. मात्र, अनुसूचित जाती गटाचे आरक्षण काढताना हवेली तालुक्यातील लोणीकाळभोर गटाऐवजी इंदापूर तालुक्यातील भिगवण गट आरक्षित असल्याचे सांगण्यात आले. उरुळी देवाची येथील देवा गायकवाड या नागरिकाने भिगवण गटातील अनुसूचित जातीची लोकसंख्या लोणीकाळभोरपेक्षा कमी असल्याची बाब जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर निवडणूक शाखेची चूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी भिगवणऐवजी लोणीकाळभोर गटाची सोडत काढण्यात आली.

# आरबीआयची पीएम-ई-ड्राईव्ह प्रस्तावाला मंजुरी...

## पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच एक हजार इलेक्ट्रिक बस दाखल होणार

**पुणे | प्रतिनीधी**

केंद्र सरकारच्या ‘प्रधानमंत्री ई-ड्राइव्ह’ योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) ताफ्यात लवकरच एक हजार इलेक्ट्रिक बस दाखल होणार आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार या बस खरेदी करण्याचा प्रस्ताव ‘रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया’ (आरबीआय) आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाकडे सादर करण्यात आला आहे.‘अवजड उद्योग खात्याचे मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली आहे. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला,’ अशी माहिती मोहोळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.




मोहोळ म्हणाले, ‘पुणे शहरातील लोकसंख्यावाढ आणि शहरीकरणामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर ताण वाढला आहे. तसेच, वाहतूक कोंडी आणि वाढते प्रदूषण यामुळे नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. सध्या पीएमपीच्या ताफ्यात सुमारे दोन हजार बस आहेत. मात्र, शहराच्या भविष्यातील गरजेनुसार या बस कमी पडत असून, मेट्रोला पूरक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जवळपास चार हजार बसची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार कुमारस्वामी यांनी प्रस्तावाला सकारात्मकता दर्शवली असून मंत्रालयातील अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिले.’

> “ पुणे शहराची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था भक्कम करण्याच्या दृष्टीने एकीकडे मेट्रो मार्गांचा विस्तार करीत असताना दुसरीकडे ‘पीएमपीएमएल’चे सक्षमीकरण हा प्रमुख अजेंडा आहे. राज्य सरकारच्या या प्रयत्नांमुळे पुणे शहराच्या वाहतूक व्यवस्थेला चालना मिळेल.
>
> **- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री**

### रिझर्व्ह बँकेशी समन्वय

» राज्य पातळीवर बस खरेदी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन रिझर्व्ह बँकेकडे आवश्यक प्रस्ताव पाठवण्यात आला. बँकेने ई-बस खरेदीसाठी आर्थिक सहाय्य आणि हमी दिल्याने केंद्राकडे अधिकृत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, असे मोहोळ यांनी नमूद केले.

# हिंजवडी आयटी पार्कबाबत 'पीएमआरडीए' प्रशासनाचा मोठा निर्णय

## आयटी कर्मचाऱ्यांनी मोर्चा काढून प्रशासनाकडे ठोस पावले उचलण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्कसह परिसरात अवजड वाहनांमुळे अपघात वाढले असून, काही जणांना जीवही गमावावा लागला आहे. यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) अवजड वाहनांवर निर्बंध लागू केले आहेत. पोलिसांनी आखून दिलेल्या वेळेतच अवजड वाहनांना प्रवेश आणि चालक नशेत नसल्याची तपासणी या बाबी बंधनकारक करण्यात आल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणारी अवजड वाहने ज्या बांधकाम व्यवसायिकांची असतील त्यांची बांधकामेही थांबवण्यात येणार आहेत.

हिंजवडी आयटी पार्क परिसरात अवजड वाहनांमुळे अपघात वाढले आहेत. याप्रकरणी आयटी कर्मचाऱ्यांनी मोर्चा काढून प्रशासनाकडे ठोस पावले उचलण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर 'पीएमआरडीए'चे अधिकारी आणि बांधकाम व्यावसायिकांची बैठक सोमवारी झाली. या बैठकीत विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. त्यात हिंजवडीसह परिसरात होणारे अपघात टाळण्यासाठी पोलीस यंत्रणेने निर्धारित केलेल्या वेळेतच अवजड वाहने शहरात यावीत, या नियमाचे काटेकोर पालन करण्याचा निर्णय घेण्यात आला. बांधकाम व्यावसायिकांनी याबाबत खबरदारी घ्यावयाची आहे. बांधकामे सुरू असलेल्या ठिकाणी रहदारीच्या नियमांचे पालन करावे. वाहनचालक नशेत नसल्याची आणि त्याचा परवाना अद्ययावत असल्याची खात्री करून एकत्रित माहिती विकासकाने त्याच्या प्रकल्पाच्या संकेतस्थळावर अद्ययावत ठेवावी, असे निर्णयही घेण्यात आले.

आयटीनगरी असलेल्या हिंजवडी – माण भागात सकाळी आणि सायंकाळी दुचाकींसह चारचाकी वाहनांची मोठी गर्दी असते. याच वेळी बऱ्याचदा बांधकाम व्यावसायिकांची अवजड वाहने या मार्गावर धावत असल्याने इतर



वाहनचालकांना अडचणी येतात. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी निर्देश दिले होते. सध्या हिंजवडी, माण, म्हाळुंगे परिसरात अनेक बांधकाम व्यावसायिकांच्या गृहप्रकल्पांची कामे सुरू आहेत. या ठिकाणी बांधकाम करताना अवजड वाहनांद्वारे सिमेंट, लोखंड आदी साहित्याची वाहतूक करावी लागते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून अवजड वाहनांमुळे सर्वसामान्य नागरिकांना धोका निर्माण झाला असून, अपघातांचे प्रमाण वाढले आहे. हे अपघात टाळण्यासाठी पीएमआरडीएने आता पावले उचलली आहेत.

### काम थांबविण्याचा इशारा

**» हिंजवडी भागात १० सप्टेंबर रोजी काँक्रीट मिक्सरखाली सापडून एका दुचाकीस्वार महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित वाहनचालकावर गुन्हा नोंदवला असून, याआधारे पीएमआरडीएने संबंधित वाहन कार्यरत असलेल्या बांधकामाची परवानगी रोखण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती पीएमआरडीएचे जनसंपर्क अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर भाले यांनी दिली.**

# दिवाळीच्या उत्सवात आकाशकंदिलांची रंगीबेरंगी गर्दी

## फोटोफेम कंदिलांना सर्वाधिक मागणी; देवी-देवतांचे छायाचित्र असलेले कंदिल उत्साही खरेदीदारांचे आकर्षण

**पुणे | प्रतिनीधी**

देवी-देवतांची आणि महापुरुषांची छायाचित्रे असलेले आकाशकंदील, फुलांपासून ते दिव्यांपर्यंत वेगवेगळ्या डिझाइनमधील कंदील, फोटोफेम आकाशकंदील आणि जय हनुमान, जय श्री राम, जय गणेश, असे विविध जयघोष लिहिलेले कंदील, अशा वैविध्यपूर्ण आणि कलात्मक आकाशकंदिलांनी बाजार पेठा उजळल्या आहेत.

यंदा दिवाळीसाठी फोटोफेम प्रकारातील आकाशकंदिलांचा ट्रेंड असून, या प्रकारातील आकाशकंदिलांना पुणेकरांकडून मागणी आहे. फुले, मोरपंख, दिवे-पणत्या या डिझाइनमधील कंदिलांचीही मागणी होत असून, खास वारली पेंटिंग असलेल्या कंदिलांचीही चलती आहे. वूडन शीट, कागदी, कापडी प्रकारातील पर्यावरणपूरक कंदिलांना मागणी वाढली असून, घराच्या सजावटीच्या छोट्या रंगबिरंगी कंदिलांचीही खरेदी होत आहे.

दिवाळी सण जवळ आला आहे. आपले घर दिवे-पणत्यांसह आकाशकंदिलांच्या प्रकाशाने उजळावे, ही प्रत्येकाचीच इच्छा असते. आकाशकंदील हा दिवाळीच्या सणातील महत्त्वाचा भाग असून, दरवर्षी नावीन्यपूर्ण प्रकारचे कंदील खरेदी करण्यावर भर दिला जातो. यंदाही वेगवेगळ्या प्रकारच्या कंदिलांनी बाजारपेठा सजल्या असून, कंदिलांच्या लख्ख प्रकाशाने कंदील विक्रीचे स्टॉल, दालने उजळली आहेत. रविवार पेठेतील बोहरी आळी, मंडई, कोथरूड, नदीपात्रातील स्टॉल्स, शनिवारवाड्या-जवळील



स्टॉल्स, कॅम्प, डेक्कन, खडकी आदी ठिकाणी कंदिलांची विक्री होत आहे. येथे कंदील खरेदीचा उत्साह पाहायला मिळत आहे. पारंपरिक कंदिलांच्या जोडीला नवीन प्रकारातील कंदील बाजारात आहेत. त्यात वूडन शीट, कागदी, कापडी आणि बांबूने तयार केलेल्या कंदिलांना पसंती मिळत आहे.

'जाणता राजा' लिहिलेले कंदील, ज्यूट प्रकारातील कंदील असो वा दिवे-पणत्या, स्टार, बासरी असे विविध प्रकारचे कंदील लक्ष वेधून घेत आहेत. फोल्डिंग आकाशकंदील, फोटोफेम असलेल्या कंदिलांना सर्वाधिक मागणी आहे. फोटोफेम आकाशकंदिलांमध्ये भगवान शंकर, देवी लक्ष्मी, श्री गणेश, प्रभू श्री राम, श्री हनुमान, श्री विठ्ठल अशा विविध देवी-देवतांची तसेच महापुरुषांची छायाचित्रे असल्याने अन् त्यात एलईडी दिवे लावलेले असल्याने या कंदिलांना पुणेकरांकडून मागणी होत आहे.